महाराष्ट्र पोलीस सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचेकार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे.
दुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१ mail :pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. – ३६३/२०२२** **दिनांक – २९/११/२०२२**

## हॉटेल मालकास मारहाण करुन लुबाडणा-या आरोपीतास हरियाणा राज्यातुन अटक -वालीव गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगीरी

वालीव पोस्टे हद्दीत दि. ०२/०८/२०२२ रोजी ००.३० वा सुमारास फिर्यादी हे त्यांचे स्कुटीवरुन त्यांचे राहते बिल्डींगचे गेट जवळ आले असता त्यांचे पाठीमागुन एका अनोळखी इसमाने फिर्यादी यांना कोणत्यातरी हत्याराने उजव्या कानाचे मागील बाजुस उपट मारुन गंभीर दुखापत करुन फिर्यादी यांचेकडे असलेली बॅगमधील मोबाईल फोन व रोख रक्कम असा माल जबरदस्तीने हिसकावुन घेऊन पळून गेला सदर बाबत वालीव पोलीस ठाणे येथे अनोळखी इसमा विरुध्द गुन्हा रजि.नं.७६४/२०२२ भा.द.वि.स.क - ३९४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन वरिष्ठांचे सुचनेप्रमाणे वालीव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेतील अधिकारी व अंमलदार यांची वेगवेगळी पथके तयार करुन सदर गुन्हयाचे घटनास्थळावरुन मिळालेले तांत्रीक पुरावे व मिळालेल्या महितीच्या आधारे सदर गुन्हयातील आरोपीत नामे १) राजेश कागडा, वय – २८ वर्षे, रा. पो.थाना - रामनगर, ता.जि. करनाल, राज्य - हरियाणा यास हरियाणा येथुन व २) निकेत कनोजीया वय २९ वर्षे रा सोमेश्वर नगर नायगाव वसई पुर्व ता. वसई जि. पालघर यास नालासोपारा पुर्व येथुन सापळा रचुन त्यास सदर गुन्हयात अटक केली. आरोपीताने फिर्यादी हा त्याचे दुकानातुन चिकन खेरदी करीत नसल्याचा राग मनात धरुन फिर्यादीस मारहाण करुन लुबाडल्याचे कबुल केले आहे. सदर गुन्हयाचा तपास स.पो.निरी.सांगवीकर हे करीत आहेत.

सदर कामगीरी ही श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त परीमंडळ - २ वसई, श्री. चंद्रकांत जाधव, सहायक पोलीस आयुक्त, नालासोपारा विभाग तथा अतिरिक्त कार्यभार सहायक पोलीस आयुक्त,तुळींज विभाग, वालीव पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री.कैलास बर्वे, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.मिलींद साबळे, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे, सपोनि/ज्ञानेश फडतरे , संतोष सांगविकर, पो.हवा मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, राजेंद्र फड, सतिश गांगुर्डे, आत्माराम दिघे, पो.ना/बाळु कुटे, पो.अंम- सचीन मोहीते, जयवंत खांडवी, सचीन खताळ, गजानन गरिबे यांनी पार पाडली आहे.

------------ooo------------


Shot on OnePlus